# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 17 January 2026
# Time 01.00 to 01.05 PM
# Language Marathi
# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
# प्रादेशिक बातम्या
# दिनांक १७ जानेवारी २०२६ दुपारी १.०० वा.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मालदा रेल्वे स्थानकावर हावडा, गुवाहाटी आणि कामाख्या दरम्यान धावणाऱ्या देशातील पहिल्या वंदे भारत स्लीपरकोच-शयनयान रेल्वेला दुरदृष्ट प्रणालीद्वारे हिरवा झेंडा दाखवतील. ही शयनयान वंदे भारत रेल्वे पूर्णपणे वातानुकूलित असून प्रवाशांना परवडणाऱ्या दरात सेवा देणार आहे. यामुळे लांब पल्ल्याचा प्रवास जलद, सुरक्षित आणि अधिक सोयीस्कर होणार आहे. एकूण ८२३ प्रवाशांची क्षमता असलेल्या या रेल्वेत १६ आधुनिक कोच आहेत.

दरम्यान, पंतप्रधान मोदी पश्चिम बंगालमध्ये चार प्रमुख रेल्वे प्रकल्पांची पायाभरणी करतील. संध्याकाळी, ते आसाममधील गुवाहाटी इथं बोडो समुदायाच्या समृद्ध वारशाचे उत्सव साजरा करणाऱ्या ऐतिहासिक सांस्कृतिक कार्यक्रमात उपस्थित राहतील.

****

केंद्र सरकारनं ऑनलाइन गेमिंग कायद्याअंतर्गत मोठी कारवाई करत २४२ बेकायदेशीर सट्टेबाजी आणि जुगाराशी संबंधित संकेतस्थळं ब्लॉक केले आहेत. यामुळे आतापर्यंत बंद करण्यात आलेल्या अशा वेबसाइट्सची संख्या ७ हजार ८०० हून अधिक झाली आहे. ही कारवाई वापरकर्त्यांचं, विशेषतः युवकांचं संरक्षण करण्यासाठी तसंच अनियंत्रित ऑनलाइन सट्टेबाजीमुळे होणारे आर्थिक आणि सामाजिक नुकसान रोखण्यासाठी करण्यात आल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

इराणमधील वाढत्या तणावामुळं भारतीय नागरिक काल रात्री उशिरा नवी दिल्लीत पोहोचले आहेत. इराणमधील अस्थिर परिस्थिती आणि असुरक्षितता लक्षात घेता भारत सरकारनं आपल्या नागरिकांना इराण सोडण्याचं आवाहन केलं होतं. इराणहून परतलेल्या भारतीय नागरिकांनी सरकारच्या पाठिंब्याबद्दल आणि सहकार्याबद्दल आभार मानले आहेत. इराणमधील घडामोडींवर बारकाईनं लक्ष ठेवून आहोत आणि आपल्या नागरिकांची सुरक्षेसाठी वचनबद्ध असल्याचं भारतीय परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे.

****

पुणे आणि पिंपरी चिंचवड या दोन्ही महापालिकांच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला अपेक्षित यश मिळालं नाही. “या निवडणुकीतील जनतेचा कौल हा सर्वोच्च आहे आणि तो आम्ही पूर्ण आदरानं स्वीकारतो” अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुकीत जिथं अपेक्षित यश मिळालं नाही, तिथं जनतेचा विश्वास पुन्हा मिळवण्यासाठी आम्ही अधिक जबाबदारीनं, प्रामाणिकपणे आणि दुप्पट जोमानं काम करत राहू, असं अजित पवार यांनी म्हटलं आहे.

****

राज्यातील महानगरपालिका निवडणुका पार पडल्यानंतर आता जिल्हा परिषद तसंच पंचायत समिती निवडणुकां बिगुल अधिकृतपणे वाजला आहे. उमेदवारांकडून अर्ज भरण्याची तयारी सुरू असून, या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगरमधील सिल्लोड तालुक्यातील विविध गावांमधून सुमारे ५०० नागरिकांनी भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान गावपातळीवरील विकास, लोकांच्या प्रश्नांसाठी आणि मजबूत लोकशाहीसाठी आगामी लढत निर्णायक ठरणार असून, ही लढाई जनतेच्या विश्वासावर जिंकण्याचा संकल्प करण्यात आला.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्ष पदासाठी झालेल्या निवडणुकीत काँग्रेसच्या चार नगरसेवकांनी भारतीय जनता पक्षाचे नवनाथ बारगळ यांना मतदान केलं, यामुळे बारगळ यांचा अकरा विरुद्ध नऊ अशा मतांनी विजय झाला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार गजानन फुलारे यांना नऊ मतं मिळाली, त्यांना पराभव स्वीकारावा लागला.

****

लाडकी बहिण योजनेचे पैसे दोन महिन्यांपासून प्रलंबित असल्याच्या कारणावरुन भंडारा शहरात महिलांनी राष्ट्रीय महामार्ग नागपूर नाका इथं रास्तारोको आंदोलन केलं आहे. भंडारा शहरातील अनेक महिलांचे अर्ज बाद झाल्यामुळे त्यांनी हे पाऊल उचलल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

शिख धर्मियांचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या हौतात्म्य शताब्दी वर्षानिमित्त नांदेड इथं येत्या २४ आणि २५ जानेवारी रोजी हिंद दी चादर हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाची तसंच श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या कार्याची माहिती घरोघरी पोहोचवण्यासाठी लातूर जिल्ह्यातही शिक्षण विभागामार्फत विशेष जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत शाळा, महाविद्यालयांमध्ये श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या जीवनावर आधारित माहितीपट, गीत दाखवण्यासह विविध स्पर्धांचं आयोजन करण्यात येत आहे.

दरम्यान, लातूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळा आणि शासकीय, निमशासकीय, खासगी शाळांमध्येही विशेष जनजागृती उपक्रम राबवण्यात आला. या स्पर्धांमध्ये सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित केलं जाणार आहे.

****

एकोणीस वर्षाखालील विश्वचषक एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत झिम्बाब्वेतील बुलावायो इथं भारताचा गट अ मधील दुसरा सामना बांगलादेशसोबत काही वेळात सुरु होणार आहे.

****